# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.11.2025** **वार:शनिवार**

1. बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत
2. बिहारची विकासयात्रा आता थांबणार नाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही
3. जेष्ठ शिल्पकार राम सुतार यांना 2024 या वर्षीचा महाराष्ट्रभूषण पुरस्कार प्रदान.
4. पुण्यातील नवले पूल इथं झालेल्या अपघातसंदर्भात उपाययोजनांसाठी संबंधित यंत्रणांसोबत आज बैठक आणि
5. कोलकाता क्रिकेट कसोटीमध्ये भारतानं दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव 159 धावात गुंडाळला.

**<u>बिहार निवडणूक निकाल</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. विधानसभेच्या 243 जागांपैकी 202 जागांवर रालोआचे उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये भारतीय जनता पक्षाचे 89 आणि संयुक्त जनता दलाचे 85 उमेदवार निवडून आले असून लोक जनशक्ती पक्षाला 19 जागांवर विजय मिळाला आहे. विरोधी आघाडीतल्या राष्ट्रीय जनता दलाला केवळ 25 जागाच जिंकता आल्या तर काँग्रेस पक्षाला 6 जागांवर विजय मिळवता आला. बिहारची विकास यात्रा आता थांबणार नाही अशी ग्वाही देत बिहारमधल्या यशाचा आनंद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. बिहार विधानसभा निवडणुकीतल्या विजयानंतर काल नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते. बिहार निवडणुकीचा विजय हा बिहारमधल्या महिलांचा विजय आहे असं सांगताना पंतप्रधान म्हणाले....

**आज की जीत ने एक नया सकारात्मक एमवाई माई फार्मूला दिया है और ये है महिला और यूथ। आज बिहार देश के उन राज्यों में है, जहां सबसे ज्यादा युवाओं की संख्या हैं और इसमें हर धर्म और हर जाति के युवा है।**

बिहारमधला विजय म्हणजे विकास केंद्रित आणि लोक कल्याणकारी योजनांवर जनतेनं दाखवलेला विश्वास असल्याचं भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. तर बिहारमधलं प्रत्येक मत हे भारताच्या सुरक्षेशी तडजोड करणाऱ्यांना जनतेनं दिलेलं उत्तर आहे अशी प्रतिक्रिया केंद्रिय गृह मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली.

हा विजय म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेनं दाखवलेला विश्वास असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. या निवडणुकीत इतर सर्व मुद्दे बाजूला पडून विकास आणि सुशासन हेच मुख्य मुद्दे ठरले असल्याचंही फडणवीस यांनी नमूद केलं.

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या स्पष्ट बहुमतावर प्रतिक्रिया देताना पुण्याचे खासदार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की बिहारच्या 'डबल इंजिन'सरकारनं राबवलेल्या विकास कामांवर जनतेने पुन्हा विश्वास व्यक्त केला आहे.

दरम्यान, या निवडणुकीतल्या पराभवाचं आम्ही विश्लेषण करू आणि लोकशाही वाचवण्याचा प्रयत्न करू असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**<u>महाराष्ट्र भूषण</u>**

विख्यात शिल्पकार राम सुतार यांनी घडवलेली शिल्पं इतिहासाची साक्षीदार असून त्यातून अभिव्यक्त होणारा वारसा शेकडो वर्ष अबाधित राहील अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राम सुतार यांचा गौरव केला. सुतार यांना राज्य सरकारचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. उत्तर प्रदेशात नोएडा इथं सुतार यांच्या निवासस्थानी झालेल्या या अनौपचारिक कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. राम सुतार यांनी आपल्या शिल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशाचा नावलौकिक जगभरात वाढवला आहे. त्यांच्यामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्काराची उंची वाढली असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. प्रतिभावान ऋषीतुल्य व्यक्तिमत्व असलेले राम सुतार हे मराठी माणसाचा मानबिंदू आहेत असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

**<u>नवले पूल अपघात</u>**

पुण्यातील नवले पूल इथं झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल घटनास्थळी जाऊन पाहणी केली. हा अपघात अत्यंत दुर्दैवी आहे. असा प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाईल असं मोहोळ यावेळी म्हणाले. अल्पकालीन उपाययोजनांसंदर्भात आज संबंधित यंत्रणांसोबत बैठक घेतली जाईल असं सांगत मोहोळ पुढे म्हणाले...

**खेड शहापूरच्या टोलनाक्यावरती सगळे लोड जे काही ट्रक येतात, त्यांचे लोड चेक करणे, त्या गाड्या चेक करणे किंवा त्यांना डायव्हर्ट करून पलीकडच्या घाटातून त्यांना जाण्यासाठी आता काही दिवस त्यांना मार्ग तिथं तयार करून देणं, कॅमेरे स्पीड गन्स चे कॅमेरे जे आहेत ते वाढवणे असेल उमलसची व्यवस्था वाढवण्यास हा तात्पुरते पण अपघात रोखण्यासाठीचे उपाय आणि पर्मनंट उपाय हाच आहे की बत्तीस किलोमीटरचा ओव्हरब्रिज बनवूया. घाटापासून जांभुळवाडी पासून ते रावेत पर्यंतचा तो जो काही उन्नत म्हंटलंय त्याला उन्नत कॉरिडॉर म्हटलंय तर त्याची लवकरात लवकर तो कार्यान्वित व्हावा**.

**<u>आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा</u>**

महाराष्ट्रातील स्टार्टअप्स, बचत गट आणि 'एक जिल्हा एक उत्पादन' अंतर्गत उत्पादित वस्तुंना हक्काची बाजारपेठ मिळवून देणं तसंच लहान उद्योगांच्या व्यापारवाढीसाठी राज्य शासन नेहमीच प्रयत्नशील असल्याचं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं 44व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यातील महाराष्ट्र दालनाचं उद्घाटन काल सामंत यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या व्यापार मेळ्याला भेट देऊन दालनातील प्रतिनिधींशी संवाद साधला आणि उत्पादनांची पाहणी केली. भारत व्यापार वृद्धी संस्थेतर्फे आयोजित या मेळाव्यात महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळानं 'एक भारत श्रेष्ठ भारत' या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्र दालनाची उभारणी केली आहे.

**<u>बालदिन</u>**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त कालपंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशातून पंडित नेहरु यांना अभिवादन केलं. नवी दिल्लीत शांतिवन या नेहरूंच्या समाधीस्थळी काँग्रेसअध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांनी पुष्पांजली अर्पण केली. राज्यासह देशभरात विविध ठिकाणी पंडित नेहरू यांना अभिवादन करण्यात आलं. हा दिवस बालदिन म्हणूनही साजरा केला जातो. त्या निमित्तानं राज्यात मुलांसाठी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>बालहक्क संरक्षण</u>**

बालकांच्या हक्काचे संरक्षण हे महिला आणि बालविकासविभागाचं आद्य कर्तव्य आहे, त्यादृष्टीनं बालकांच्या हक्कांचंआणि अधिकारांचं संरक्षण करुन पुरोगामी महाराष्ट्र अधिक भक्कम करुया, असं आवाहन महिला आणि बाल विकास आयुक्तालयाचे सह आयुक्त राहुल मोरे यांनी केले. बालदिनानिमित्त पुण्यात आयोजित बाल हक्क संरक्षण परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

**<u>कामिनी कौशल निधन</u>**

प्रख्यात अभिनेत्री कामिनी कौशल यांचं काल मुंबईत, वृद्धापकाळानं निधन झालं त्या 98 वर्षांच्या होत्या. नीचा नगर या 1946 मध्ये आलेल्या चित्रपटातून कौशल यांनी अभिनयाच्या कारकिर्दीला सुरुवात केली, सत्तर वर्षे त्यांनी विविधांगी भूमिकांद्वारे अभिनय क्षेत्रात आपला ठसा उमटवला. वयाच्या 95 व्या वर्षी अभिनय केलेला लाल सिंह चड्ढा हा त्यांच्या कारकिर्दीतला शेवटचा चित्रपट ठरला.

**<u>क्रिकेट</u>**

कोलकाता इथं इडन गार्डन मैदानावर कालपासून सुरु झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव 159 धावात गुंडाळला. पाहुण्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. काल खेळ थांबला तेव्हा भारताच्या पहिल्या डावात एक बाद 37 धावा झाल्या होत्या. यशस्वी जयस्वाल 12 धावांवर बाद झाला तर के एल राहुल 13 आणि वॉशिंग्टन सुंदर सहा धावांवर खेळत आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.